http://www.epitomejournals.com, Vol. 2, Issue 12, December 2016, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# आदिवासींची उच्च शिक्षणामधील सद्यस्थिती



**माधव हरि गावित**

शिक्षणशास्त्र विभाग, पीएच डी संशोधक विद्यार्थी

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

&

डॉ.पी.बी.पगारे

मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक,

शिक्षणशास्त्र विभाग,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## Abstract

मानवाचा सर्वांगीण विकास , विविध क्षमतांचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शिक्षणाच्या माध्यमातून होतो व हेच शिक्षणाचे उद्‌दिष्टे आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही. आदिवासींचा इतिहासच मूळात त्यांनी आक्रमणावाद्यांविरूध्द केलेल्या प्रतिकाराचा इतिहास आहे. वसाहतवाद्यांविरूध्द प्रतिकाराची व संघर्षाची सुरूवात आदिवासींनी केली. इ.स.पूर्व १५०० च्या सुमारास नागरी संस्कृती माहिती नसलेल्या भटक्या टोळयांचा भारतावर म्हणजे सिंधू संस्कृतीवर जो आघात झाला त्या आधीचे लोक , ते आदिवासी भारतातील आदिवासींना वेरिअर एल्विन आणि जवाहरलाल नेह रू यांनी मूलनिवासी म्हणून संबोधले. जगातील सर्व देशात आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. विशेषत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या खंडातील देशात आजही आदिवासी जमाती मोठया प्रमाणात आढळतात. १९९७ च्या आकडेवारीनुसार जगातील ७० देशातील मिळून जागतिक लोकसंख्येच्या ४ टक्के एवढी आदिवासी जमातींची लोकसंख्या आहे.



## Keywords

आदिवासी, उच्च शिक्षण, लोकसंख्या, संघर्ष, विकास


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

**Research Paper**

## प्रस्तावना

डॉ. एल्विन Aborigineds या शब्दाने आदिवासी जमातीचे आदिवासीत्व सांगतात. तर डॉ. हट Primitive Tribe (आदिम जमाती) असे म्हणतात. रिसले, लॅस्सी, गिक्सन, शुबर्न, सेडविक आणि मार्टिन या विचारवंत , समाजशस्त्रज्ञांनीही त्यांना अगदी प्राचीन Aboriginal किंवा अगदी मूळचे रहिवासी Aborigines म्हटले आहे. त्याचप्रमाणे थोर भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. घुर्ये यांनी त्यांना तथाकथित मूळचे रहिवासी (so called Aborigines) असे म्हटले आहे. १९३१ मध्ये ब्रिटिश सरकारने आदिवासीची जनगणना केली त्यावेळी पशुपूजक ( Animist) अशी त्यांची नोंद केली. ब्रिटिशांनी आदिवासी ( Tribal) हाच शब्द वापरला. पुढे स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेचे , कलम ३४२(१) अनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या सामाजिक समूहांना अनूसूचित जमाती ( Scheduled Tribes) असे संबोधले. जगातील २३ टक्के आदिवासीपैकी भारतात ८ टक्के पेक्षा जास्त आदिवासी आहेत. त्यांपैकी ५ टक्के आदिवासी भयाण मरणयातना भोगताहेत तसेच एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ७१ टक्के आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेश , महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, बिहार आणि ओरिसा या सहा राज्यांमध्ये वास्तव्य करते. यामध्ये एकूनच आदिवासी जमातीची लोकसंख्या आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता व व्यवस्थेचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. याला बघून असे वाटते की भारतीय शैक्षणिक पध्दती अत्याधूनिक करण्याची वेळ

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

आली आहे जेणेकरून देशातील पदवीधर आपला देश जास्तीत जास्त विकसित करून वास्तविक २१ व्या शतकामधील आदिवासी समाज येण्यास प्रेरणा मिळेल.

## भारतात उच्च शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या प्रमाणात आदिवासींची लोकसंख्या ९.१९ इतकी होती. त्याचप्रमाणे आदिवासींच्या समस्यांचा गंभीरपणे शासकीय पातळीवर विचार करण्याचा पहिला रितसर प्रयत्न वाय. डी. सेमिग्ंटन या आय सी एस अधिका-याची नियुक्ती क रून १९३८ साली केला. त्यावेळी मुंबई प्रांतातील आदिवासी लोकांची सर्वांगीण पाहणी करून सुधारणांसाठी सरकारला सुचना करण्याचे त्यांना सांगण्यात आले.

## काही महत्वाच्या शिफारशी

- आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्कूल बोर्डाकडून काढून स्वत:सरकारने घ्यावी.
- सरकारला सल्ला देणा-या समित्या आदिवासींच्या व सामाजिक कार्यकताच्या सहभागातून बनवाव्या.
- आदिवासी मुलांना सक्तीचे शिक्षण घावे. प्रत्येक तालुक्यात आश्रमशाळा व बोर्डिग काढावे.
- त्याचप्रमाणे सेमिग्टन नंतर मुंबई सरकारने १९४७ साली ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या पाहणीसाठी वांद्रेकर समिती नेमली, त्यांनी शिक्षासंबंधी काही शिफारशी केल्या.
- सर्व आदिवासींना सक्तीचे शिक्षण.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

- ५०० शे.च्या वर लोकसंख्येच्या गावात प्राथमिक शाळा
- प्रत्येक दहा शाळांमध्ये एक केंद्रशाळा व वसतीगृह व शेतीचे शिक्षण देण्यासाठी जमीन
- शाळेला व शिक्षकाला शाळेसाठी व राहण्यासाठी स्वतंत्र इमारती
- आदिवासी क्षेत्रातल्या शिक्षकांना विशेष भत्ता.

१९२६ पासून सतत सगळया अहवालात आदिवासी शिक्षणावर नियमित शिफारशी केलेल्या दिसतात. त्या योजना आखून आर्थिक तरतुदीचे व खर्चाच्या आकडयांचे अहवाल प्रसिध्द झालेले दिसतात. परंतु सगळया पंचवार्षिक योजनांमधल्या व अन्य अनेक प्रसंगाने केलेल्या तरतुदीचे आकडे पाहिले तर महाराष्ट्रातील आदिवासी सगळया श्रीमंत जगत असावा. कारण त्यांच्या योजना व तरतुदी भल्या मोठया आकडेवा-या असलेल्या दिसतात. प्रत्यक्षात शंभर वर्षात पाच वर्षा इतकाही विकास दिसत नाही. म्हणजेच सरकारच्या जवळपास योजना आदिवासी पर्यंत पोहचल्याचे दिसत नाही. हे काही आकडेवारी पाहिल्यास जाणवते.

१९७१ सालापर्यंत ४.३ टक्के साक्षरता, शिक्षण नव्हे, ६००० हजार खेडयांपैकी १५०० खेडयात शिक्षणाचा पुर्ण अभाव ९० ,००० हजारात ३ टक्के शिक्षण ,३० लाख लोकसंख्येत ३ हजार विद्याथ्र्यानी माध्यमीक शिक्षण पूर्ण केले.१० ,००० हजार विद्याथ्र्यामधून माध्यमिक पातळीवर १२६ , तर उच्च पातळीवर मात्र १२ इतके प्रमाण असल्याचे दिसते. हे अशा प्रकारे साक्षरता चालल्यानंतर शिक्षण , समाज, आर्थिक क्षेत्र या मध्ये विकास कशा स्व रूपात आणि कधी आदिवासी जन समूदाय शिक्षणाच्या प्रवाहात येईल.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## आदिवासी समाजातील साक्षरता

सर्वसाधारणपणे महाविद्यालयात अगर विद्यापीठात मिळणारे शिक्षण म्हणजे उच्चशिक्षण म्हणून संबोधले जाते. आदिवासींच्या शैक्षणिक स्थितीकडे पाहिल्यास प्रांतनिहाय शैक्षणिक प्रगती किंवा शिक्षणाचे प्रमाण कमी जास्त असल्याचे दिसून येते. १९९१ च्या जनगणना अहवालामध्ये शैक्षणिक स्थितीची विविधता दिसून येते. भारतातील आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण १९६१ , १९७१, १९८१ आणि १९९१ च्या जनगणनेनूसार अनुकमे ८.५३ टक्के ,११.३० टक्के,१६.३५ टक्के, आणि २९.६१ टक्के होते.गेल्या ३० वर्षात आदिवासी जीवनासंबंधी लोकांना बरीच माहिती झालेली आहे. १९३५ ते १९५०च्या दरम्यान भिल्ल सेवा मंडळ , डांग सेवा मंडळ, आदिवासी सेवा मंडळ, जंगल कामगार सोसायटया यांसारख्या सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनाचे काम करणा-या अनेक संस्था आदिवासी विभागात स्थापन झाल्या आहे. शासनातर्फे चालविल्या जाणा-या विविध योजनांव्दारेही सुधारणेचे व बदलाचे कार्य आदिवासी समाजात चालू आहे.

## उच्च शिक्षणामधील सद्यस्थिती

आजादी के तात्काल बाद संविधान मे सामाजिक, शैक्षणिक एवं आर्थिक रूप से जिन दो वर्गो या समूहो चिन्हीत किया गया था, उनमें एक आदिवासी वर्ग है जिसे संविधान में अनुसूचित जनजाति, माना गया था, परंतु आज आदिवासी वर्ग को देश का सर्वाधित शोषित वंचित और फिसदी वर्ग-समूह बना दिया गया है.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

त्याचप्रमाणे आदिवासी समाजाला विविध प्रश्न आणि अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समाजाच्या केवळ आर्थिक समस्या नव्हेत तर शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्याही मोठया प्रमाणात आहेत.

१ शैक्षणिक समस्या

१ उच्च शिक्षणामधील शिक्षणाचा अभाव.

२ पुरेशा शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसणे.

३ पालकांचे शिक्षणाकडे असलेले दुर्लक्ष व उदासीनता.

४ महाविद्यालय अध्यावर सोडून देणे.

५ आश्रम शाळेत दिल्या जाणा-या वस्तुंचा निकृष्ट दर्जा.

६ भाषा माध्यमाचा प्रश्न.

७ शैक्षणिक साहित्यात स्थानिक वैशिष्टयांचा अभाव.

८ अभ्यासक्रम आणि आदिवासी जीवन यातील सुसंगतीचा अभाव.

९ आदिवासी जीवनासंबंधी असलेली अनास्था.

१० अज्ञान व अंधश्रध्दा.

११ पदवीधर गुणवत्तेचा अभाव.

आरंभीच्या काळात गुणात्मक वाढीकडे आपण प्रकर्षाने लक्ष दिले नाही तरी उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेकडे लक्ष देणे आवश्यक होते. आज आपल्या देशात ऐकीकडे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी व जागतीक दर्जाच्या शिक्षणपध्दतीचा अवलंब होण्यासाठी ग्रामीण आणि शहरी क्षेत्राचे संपूर्ण संशोधन करणे गरजेचे आहे. आधुनिक शैक्षणिक उप क्रमांतर्गत *सब पढो-सब बढो* हा संदेश देउन शिक्षणाचे

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

डिजीटलायझेशन म्हणजे ई-शिक्षणासाठी, लर्निंग कॉन्सेप्ट ही अभिनव संकल्पना जिवनाचे कार्य सु रू आहे. या आधुनिक संकल्पनेअंतर्गत परंपरागत शिक्षण पध्दतीतील दप्तर व पुस्तकाचे रूपांतर आता सी. डी. डि. व्ही. डी ,पेन ड्राईव्ह, मेमरी कार्ड, टॅबलेट आदि हलक्या शिक्षा साधनांमध्ये परावर्तित होणार आहे मग ज्याव्दारे शैक्षणिक अभ्यासकम व्हिज्युअलाईज आणि सहज समजू शकेल यासाठी ही जागतीक दर्जाची शिक्षणपध्दती देशातील ग्ारमीण आणि शहरी क्षेत्रातील सर्व विद्याश्र्यीसाठी उपलब्ध व्हावी म्हणून भारत सरकार , मनुष्यबळ मंत्रालय, शिक्षण मंत्रालय , आदिवासी विभाग प्रयत्न करीत आहेत. ही बाब देशातील शिक्षणाची भविष्यकालीन गुणवत्ता वाढविण्यासाठी व जागतिक स्पर्धेत टिकाव धरण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. परंतू आदिवासी युवक हा फक्त सुसक्षित होत चालला असून तो शिक्षित होण्याच्या मार्गोव रून विचलीत होतांना दिसत आहे.कारण आज आदिवासी विभागाकडून अनेक प्रकारच्या शासकीय योजना उपलब्ध असतांना स्वातंत्र्यानंतर सुध्दा आदिवासी समाजाचा विकास होतांना दिसत नाही.

## समारोप

आज संपूर्ण जगात नित्य नवनवीन शास्त्र , घटक, पध्दती यांची निर्मिती होते. त्यांच्याबरोबरच आदिवासींना योग्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या उन्नतीसाठी पोषक वातावरण, प्रशिक्षित, गुणवत्ता धारण प्रशिक्षण असेल तर त्यांच्या ज्ञानात व कौशल्यात भर टाकले जाईल. त्याच्यासाठी उच्च शिक्षण घेणा-या , उच्च गुणवत्ताधारक व पुर्ण कौशल्य विकसित केलेल्यांना उच्च शिक्षणात समाविष्ट

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

करून घ्यावे जेणेकरून आदिवासींना त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक बदल घडविण्यामध्ये परिपुरक ठरेल व त्यांना त्यामधुन अनेक प्रकारचे रोजगार संधी प्राप्त करून देणारे शिक्षण निर्माण होईल.


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## संदर्भसूची


- मोटे, म. ना. महाराष्ट्रातील आदिवासीच्या चळवळीतील श्रीमती गोदावरी परूळेकरांच्या भूमिकेचा अभ्यास (पीएच.डी प्रबंध-मार्च २००७)
- चव्हाण़, सी.र.शासकीय उपयोजनांचा अनुसूचित जमातीवर (पारधी समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास (पीएच.डी प्रबंध-जुन-२०११)
- डॉ.गारे,गो. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती (कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे-३०)
- www.tribal.nic.in (30-12-2016)
- Wikipedia-Higher education in India (30-12-2016)
- All India survey on higher education MHRD (30-12-2016)
- Tribal Population in India-Journal of Regional Development (30-12-2016)


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.